आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

८ एप्रिल २०२४ - सोमवार

**ठळक बातम्या**

- लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यासाठी उमेदवारी अर्ज मागं घेण्याची मुदत संपली /राज्यातल्या ८ जागांसाठी आता २०४ उमेदवार रिंगणात

- विरोधकांनी सत्तेत असताना फक्त स्वत:च्याच परिवाराचा विकास केल्यानं महाराष्ट्राची उपेक्षा झाल्याची प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची चंद्रपुरात टीका

- काँग्रेसचं सरकार आलं तर अग्नीवीर योजना, कंत्राटी नोकरीची पद्धत बंद करण्याचं राहुल गांधी यांचं आश्वासन

- महाराष्ट्रात मुख्यमंत्र्यांच्या शासकीय निवासस्थानी राजकीय बैठका होत असल्याच्या तक्रारीवरुन निवडणूक आयोगाची संबंधित अधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस

**आणि**

- गुंतवणूकदारांनी खरेदीवर भर दिल्यानं दोन्ही शेअर बाजारांच्या निर्देशांकांनी गाठली नवी उंची

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यासाठी उमेदवारी अर्ज मागं घेण्याची मुदत आज संपली. या टप्प्यात राज्यातल्या ८ लोकसभा मतदारसंघांमधल्या ९५ उमेदवारांनी माघार घेतली. त्यामुळं आता केवळ २०४ उमेदवार रिंगणात उरले आहेत . अमरावतीमध्ये ३७, परभणीत ३४, हिंगोलीत ३३, वर्ध्यात २४, नांदेडमधे २३, बुलडाण्यात २१, यवतमाळ-वाशिममध्ये १७ आणि अकोल्यात १५ उमेदवार

निवडणूक लढवणार आहेत. या लोकसभा मतदारसंघांमधे येत्या २६ तारखेला मतदान होणार आहे.

**<><><><><>**

रालोआ सरकारच्या काळात महाराष्ट्रातच नाही तर देशाच्या इतर भागातही नक्षलवाद कमकुवत झाला असून विकासाला चालना मिळाल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज सांगितलं. लोकसभा निवडणुकीसाठी त्यांची राज्यातली पहिली प्रचारसभा चंद्रपुरात झाली. महायुतीचे चंद्रपूरचे उमेदवार सुधीर मुनगंटीवार तसंच गडचिरोली चिमूर मतदार संघाचे उमेदवार अशोक नेते यांच्यासाठी ही प्रचारसभा होती. त्यावेळी मोदी बोलत होते. विरोधकांनी सत्तेत असताना फक्त स्वत:च्याच परिवाराचा विकास केला आणि त्यांच्या काळात महाराष्ट्राची उपेक्षा झाल्याची टीका त्यांनी केली.

गरीब, वंचित समाज मोदी सरकारला आपलं सरकार मानतो, असंही ते म्हणाले. काँग्रेसच्या जाहीरनाम्यात मुस्लीम लीगची भाषा असल्याची टिपण्णी त्यांनी केली. विकासकामात कमिशन द्या नाहीतर विकासकामं बंद करा असं महाराष्ट्रात विराेधकांच्या काळात सुरू होतं, असंही त्यांनी नमूद केलं. लोकसभा निवडणुकीत विकसित भारताचं स्वप्न साध्य करण्यासाठी भाजपा उमेदवारांना निवडून द्या, असं आवाहनही मोदी यांनी केलं.

त्यांनी मराठीतून भाषणाला सुरुवात केली आणि मराठीतून गुढी पाडव्याच्या शुभेच्छा दिल्या.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस, केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले, ओबीसी आयोगाचे राष्ट्रीय अध्यक्ष हंसराज अहिर, यावेळी उपस्थित होते.

प्रधानमंत्र्यांनी आज छत्तीसगडमधे बस्तर विभागातल्या आमाबाल गावातही सभा घेतली. देशातल्या प्रत्येक अदिवासी कुटुंबाचं जीवनमान सुधारणं ही आपली गॅरंटी असल्याचं मोदी यांनी या सभेत सांगितलं. देशाचा विकास  करणं आणि देशातल्या प्रत्येक कुुटुंबाला प्रगतीशील बनवणं हे आपलं उद्धीष्ट आहे, गेल्या १० वर्षात गरीबांच्या कल्याणासाठी केंद्रातल्या भाजपा सरकारनं अनेक योजना आणल्या, २५ कोटी लोकांना गरीबीतून मुक्त केलं, मोफत शिधा आणि आयुष्यमान सरकार योजनांमुळे लोकांच्या खर्चात कपात आणि बचतीमधे वाढ झाली, असं ते म्हणाले.

**<><><><>**

आदिवासी हे या देशाचे आणि भूमीचे पहिले हक्कदार असल्याचं काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी म्हटलं आहे. त्यांंनी आज मध्य प्रदेशातल्या सिवनी जिल्ह्यातल्या धनौरा इथं जाहीर सभेला संबोधित केलं. काँग्रेस आदिवासींना आदिवासी तर भाजपा वनवासी संबोधत असून या शब्दांमागे दोन भिन्न विचारधारा असल्याचं ते यावेळी म्हणाले.

शाहडोलमधेही राहुल गांधी यांनी सभा घेतली. काँग्रेस सरकार अग्नीवीर योजना बंद करेल, कंत्राटी नोकरीची पद्धत बंद करेल, अनुसूचित जाती जमातींच्या विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती दुप्पट केली जाईल, अशा घोषणा राहुल गांधी यांनी यावेळी केल्या. शेतकऱ्यांना कर्जमाफी, किमान आधारभूत दराची अंमलबजावणी महालक्ष्मी योजनेअंतर्गत महिलांना वार्षिक १ लाख रुपये, युवकांसाठी उद्योजकता योजना सुरु करण्याच्या आश्वासनांचा त्यांनी या सभेत पुनरुच्चार केला.

**<><><><>**

नेता, नीती आणि नियत असलेला पक्ष परिवर्तन घडवून आणू शकतो असं, उत्तर प्रदेशाचे मुख्यमंत्री आणि भाजपाचे ज्येष्ठ नेते योगी आदित्यनाथ यांनी म्हटलं आहे. ते आज वर्धा जिल्ह्यात हिंगणघाट इथं महायुतीचे वर्धा लोकसभा मतदारसंघाचे उमेदवार रामदास तडस यांच्या प्रचारार्थ आयोजित सभेत बोलत होते. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात देश सर्व क्षेत्रात विकास साधत आहे, असं ते म्हणाले.

**<><><><><>**

देशभरातल्या विविध प्रांतात विविध नावांनी साजऱ्या केल्या जाणाऱ्या गुढी पाडव्यानिमित्त राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी जनतेला शुभेच्छा दिल्या आहेत. गुढी पाडवा, चैत्र शुक्लादी, उगाडी, चेती चांद, नवरेह आणि साजिबू चैरोबा अशा विविध नावांनी साजरा केला जाणारा हा सण सर्वांसाठी आनंद, समृद्धी घेऊन येवो आणि देशाच्या विकासासाठी नेटानं काम करण्याची प्रेरणा प्रत्येकाला देवो, असं मुर्मू यांनी शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे.

उप-राष्ट्रपती जगदीप धनखड यांनीही जनतेला गुढी पाडव्याच्या शुभेच्छा दिल्या आहेत. विविधतेतल्या एकतेची भावना जपत देशवासीयांनी हा सण साजरा करावा, असं आवाहनही धनखड यांनी केलं आहे.

**<><><><><>**

महाराष्ट्रात मुख्यमंत्र्यांचं शासकीय निवासस्थान असलेल्या वर्षा बंगल्यावर राजकीय बैठका होत असल्याची तक्रार निवडणूक आयोगाकडे दाखल **झाली** होती. याप्रकरणी संबंधित अधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावल्याची माहिती राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोकलिंगम यांनी दिली. या नोटीशीचं

उत्तर प्राप्त झाल्यानंतर पुढील कारवाई होईल. मुंबई शहराच्या जिल्हाधिकाऱ्यांनी ही नोटीस बजावल्याचं ते म्हणाले.

याशिवाय मंत्री, खासदार, आमदार यांच्यासह अधिकाऱ्यांच्या शासकीय निवासस्थानांचा उपयोग राजकीय कारणासाठी होणार नाही याची खबरदारी घेण्याचं पत्रही निवडणूक आयोगानं राज्याच्या मुख्य सचिवांना लिहिलं असल्याचं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

देशांतर्गत शेअर बाजारांमधे आज गुंतवणूकदारांनी खरेदीवर भर दिल्यानं दोन्ही बाजारांच्या निर्देशांकांनी नवी उंची गाठली.

मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्सनं आज दिवसभरातल्या व्यवहारात एकदा ७४ हजार ८६९ अंकांची विक्रमी उंची गाठली. दिवसअखेर तो ४९४ अंकाची वाढ नोंदवत ७४ हजार ४४३ अंकांवर बंद झाला.

राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीही १५३ अंकांची वाढ नोंदवत २२ हजार ६६६ अंकांवर बंद झाला. निफ्टीनही दिवसभरात एकदा १८४ अंकांची झेप घेत २ हजार ६९७ अंकांची ऐतिहासिक उंची गाठली होती.

माहिती तंत्रज्ञान आणि वाहन क्षेत्रातल्या कंपन्यांचे समभाग आज विशेष तेजीत राहिले.

**<><><><><>**

देशाचा विकास हे एनडीए सरकारचे प्रमुख उद्दिष्ट असल्याचं संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी म्हटलं आहे. ते आज नमक्कल इथं एका रोड शोला संबधिक करताना बोलत होते. गेल्या दहा वर्षांत देशाची अर्थव्यवस्था, तसंच कृषी आणि पायाभूत सुविधांमध्येही वाढ होत आहे. भारत आर्थिक शक्ती बनून जगात तिसऱ्या

क्रमांकावर पोहोचेल आणि या निवडणुकीत एनडीएला 400 जागा मिळतील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

**<><><><>**

सशस्त्र दलांसाठी संयुक्त संस्कृती विकसित करण्याची गरज संरक्षण दल प्रमुख जनरल अनिल चौहान यांनी व्यक्त केली आहे. ते आज नवी दिल्ली इथं तीन्ही संरक्षण दलासाठी आयोजित परिवर्तन चिंतन परिषदेत बोलत होते. युद्ध लढण्याची क्षमता आणि अंतर्गत परिचालन वृद्धींगत करणारी संरचना तयार करून प्रत्येक संरक्षण दलाची क्षमता एकत्रित करण्याच्या गरजेवरही चौहान यांनी भर दिला. अशा संवादांमुळे भविष्यात भारतीय सशस्त्र दलात बदल घडवून आणण्यासाठी संयुक्त परिचालन संरचना विकसित होईल, असंही त्यांनी सांगितलं.

**<><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी काँग्रेसच्या जाहीरनाम्यावर केलेल्या टिपण्णीबद्दल काँग्रेसने निवडणूक आयोगाकडे तक्रार नोंदवली आहे. ज्येष्ठ नेते सलमान खुर्शीद यांच्या नेतृत्वाखालच्या शिष्टमंडळानं याबाबत नवी दिल्लीत आयोगाची भेट घेतली. काँग्रेसच्या जाहीरनाम्यात मुस्लीम लीगचा ठसा आहे या प्रधानमंत्री मोदी यांच्या विधानावर पक्षाने आक्षेप घेतला असून ही बाब गांभीर्यानं घेऊन कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी निवडणूक आयोगाकडे केली आहे. तसंच विद्यापीठांमध्ये प्रधानमंत्र्याचे होर्डिंग, भाजप नेते राजीव चंद्रशेखर यांचे कथित खोटे प्रतिज्ञापत्र आणि माहिती आणि प्रसारण मंत्रालयाने काही यूट्यूब चॅनेलवर घातलेली बंदी यांसारखे अनेक मुद्दे काँग्रेसनं उपस्थित केले असल्याचं पक्षाचे प्रवक्ते पवन खेरा यांनी म्हटलं.

**<><><><>**

येत्या चोवीस तासात भारतीय द्वीपकल्पातल्या काही भागात उष्णतेची लाट कायम राहील आणि त्यानंतर ही लाट कमी होईल असा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे. आंध्र प्रदेशचा किनारा, यानम, रायलसीमा, तेलंगणा आणि उत्तर अंतर्गत कर्नाटकात उष्णतेची लाटसदृश स्थिती कायम राहील अशी शक्यता आहे. त्याचबरोबर उप हिमालयीन पश्चिम बंगाल, सिक्कीम, आसाम, मेघालय, नागालँड, मणिपूर, मिझोराम आणि त्रिपुरात येत्या सात दिवसात हलका ते मध्यम स्वरुपाचा पाऊस पडेल, असाही अंदाज आहे. त्याचबरोबर विदर्भ, मराठवाडा, मध्य महाराष्ट्र, पूर्व पश्चिम मध्य प्रदेश, छत्तिसगडात तुरळक ठिकाणी हलका ते मध्यम पाऊस पडेल असाही अंदाज आहे.

**//<><><><>//**